# संतविचार व अंधश्रध्दा निर्मुलन

**रणधीरसिंह पवार**
मराठी विभाग,
कै. ना. अ. देशमुख महाविद्यालय,
चांदूर बाजार, जि.अमरावती.(महा.)

**प्रस्तावना :**

'संतभुमी म्हणुन अखिल विश्वामध्ये भारताला एक अद्वितीय स्थान प्राप्त झाले आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टया एक नविन जीवनदृष्टी संतांनी आपणास प्रधान केली आहे. तसेच वाङ्मयदृष्टया देखील ही जीवनदृष्टी वेगवेगळया काळात दृगोच्चर होत राहिलेली दिसुन येते. या जीवनदृष्टीचे सामाजिक, सांस्कृतीक तथा वाङ्मयीन पैलु स्वत:च्या पदरांनी संतसाहित्यातून दृष्टीगोचर होत राहिले. संतसाहित्याने आपल्या अंगभूत वैशिष्टयांतून साहित्याच्या प्रांतात आपली ओळख स्वतंत्रपणे व्हावी, अशाप्रकारचा प्रभाव निर्माण केला. एक समाजसुधारक म्हणून कार्य करीत असतांना वेगवेगळया अनिष्ट बाबींवर प्रहार करुन संतांनी समाजाला नेहमी नवी दिशा देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ज्या कालखंडात संत जगले त्या-त्या कालखंडातील समस्या देखील वेगवेगळया असल्याने या सर्वसंतांच्या कार्याची दिशा देखील वेगवेगळी असलेली दिसून येते. परंतु एक समस्या मात्र या सर्व कालखंडात समान होती ती म्हणजे 'अंधश्रद्धा'.

**संत साहित्यातील अनुभव विश्व :**

शतकानुशतके आपला समाज अंधश्रद्धेच्या अंधारात बुडून गेला आहे. तसे पाहिले तर अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात देखील अंधश्रद्धेची पाळेमुळे पसरलेली आहे. परंतु अंधश्रद्धेचा सर्वात मोठा कलंक जर कोणत्या देशाला लागलेला असेल तर तो भारताला. ह्या प्रश्नांच्या संदर्भात विचार करतांना नवे-नवे सूर, नवे-नवे पदर, कालभान-मूल्यभान-परिवर्तन-नवीन जाणीव ह्या घटकांच्या अनुषंगाने आकाराला येणाऱ्या प्रेरणाबंधाची मांडणी गवसली.

वेगवेगळया संतांच्या साहित्यात जे अनुभव क्षेत्र आहे ते व्यामिश्र स्वरूपाचे आहे. पण या सर्वांनी अंधश्रद्धेवर केलेल्या प्रहारात मात्र समानता दिसून येते. अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथा, परंपरा, रूढी, जत्रा, यात्रा आणि पाप-पुण्याच्या कल्पना यामध्ये बरेच काही कालबाह्य असते. आज आपण २१ व्या शतकात म्हणजे विज्ञान युगात वावरत आहोत तरीही अनेक प्रकारची कर्मकाण्डे, पशुहत्या आणि व्रतवैकल्ये सुरूच आहे. या सर्व प्रकारातुन समाजाची फसवणूक, छळ, लुबाडणूक आजतागायत सुरू आहे. सोबतच येरवी समाजामध्ये वेगवेगळे उद्बोधन सत्र व आदान प्रदान सुध्दा सुरूच असते. पण अंधश्रद्धा निर्मूलनात त्याचा फारसा उपसोग होत असलेला दिसुन येते नाही.

संताचे कार्य :

'जेयांच्या लीळेमाजी नीती । जियाली असे ।।'

या संतश्रेठ ज्ञानेश्वराच्या उक्तीनुसार अशांच्या आचारणाचे यथाशक्ती अनुकरण करण्याची बुद्धी समाजाला होते. एखादे ज्ञानेश्वर व तुकाराम जन्माला आले की, त्यांनी केलेल्या उपदेशाचा परिणाम समाज मनावर सातशे वर्ष टिकून राहतो. समाजाला योग्य वळण लागावे , अंधश्रध्देसारखे कलंक दूर व्हावे, हे संतकार्याचे खरे उद्दिष्ट असते. 'जगा व जगू द्या ' या उक्तिनुसार सदैव सत्प्रवृत्त राहून ईश्वर परायणतेने स्वत:च्या व समाजाच्याही कल्याणार्थ त्यांनी प्रवृत्त व्हावे हीच तळमळ आजपर्यंत संत साहित्यातुन दिसुन येते.

"बुडता हे जन न देखवे डोळा
म्हणवून कळवळा येत असे''

या कळवळयापोटीच अंधश्रध्दा निर्मूलनाच्या माध्यमातून समाजशुद्धीचे कार्य त्यांच्या हातून होत असते. मतलबी आणि लबाड लोकांपासून कर्मकांडाच्या, पापपुण्यांच्या भ्रामक कल्पनांपासून समाजाची ससेहोलपट थांबावी, यासाठीच संतांनी हे कार्य हाती घेतलेले दिसून येते. अर्थशुन्य कर्मकांड, अस्पृश्यता, विषमता, विटाळ-चांडाळ, देवदेवस्की,यज्ञकर्म, मंत्रयज्ञ यासारख्या अपप्रवृत्तीच्या नादी लागलेल्या जनसमुदायाला संतांनी आपल्या साहित्यातून त्यातील वैध्यर्य पटवून दिले. व सन्मार्गाला लावले.

पहिला कृतिशूर संत म्हणून महात्मा चक्रधरांचे कार्य अन्यय साधारण आहे. त्यानंतर बसवेश्वर, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास , कबीर व तात्कालीन संत कवयित्रींपासून अर्वाचीन काळातील गाडगेबाबा व तुकडोजी महाराज यांच्या पर्यंतच्या संतसाहित्यातून अंधश्रद्धेवर केलेल्या प्रहाराचा अभ्यास केल्यास त्याचे महत्त्व आपणास दिसून येते. संतसाहित्य अर्थात संतवाणी प्रत्येक काळात, प्रत्येक युगात निरनिराळया रूपात समाजाची कानउघडणी करीत आहे. समाजातून अंधश्रध्दा दूर होवून सारा समाज निर्भय व्हावा व वास्तव जिवनाला सामोरे जाण्यासाठी सिध्द व्हावा यासाठीच अंतरीच्या तळमळीने संतसाहित्य लढा देत आहे. अंधश्रध्दा आणि कर्मकाण्डाच्या मगरमिठीत सापडलेल्या समाजाला मुक्त करून त्यांच्या मनाचा गाभारा सत्य-सूर्याच्या प्रकाशाने फुलवून टाकण्याचे महान कार्य संतांनी आपल्या साहित्यातून केले.

**अंधश्रद्धा व समाज :**

माजी राष्ट्रपती ए.पी.ए.जे.अब्दूल कलाम यांनी म्हटल्याप्रमाणे २०२० पर्यंत भारत देश जागतिक महासत्ता म्हणून पुढे येण्याच्या मार्गामध्ये सर्वात मोठा अडसर जर कोणता असेल तर तो समाजात शेकडो वर्षापासुन आजपर्यंत रूतुन बसलेल्या अंधश्रध्दा. समाजातुन अंधश्रध्दा नष्ट करून समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी संतवाङ्‌मयाच्या डोळस दृष्टीची आज समाज मनाला खरी गरज आहे. बसवेश्वरांपासून थेट कर्मयोगी गाडगे महाराजांपर्यंत सर्वच संतांनी समाजाला 'मानवधर्म' शिकविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू सद्य:स्थिती लक्षात घेताही संत शिकवण केवळ देवघर आणि पारायणापुरतीच मर्यादीत असलेली दिसते. प्रत्यक्ष या संतवाङ्‌मयात सांगितलेले आचरणात मात्र कुणी आणतांना दिसत नाही. आजच्या यंत्रयुगातही ही अंधश्रध्दा मनामनात घर करून बसलेली आहे.

**सारांश :**

संतांचे साक्षेपी विचार आज घराघरात

पोहोचण्याची आवश्यकता आहे. अंधश्रध्दा निर्मुलनासाठी संतांचे विचार 'रामबाण औषधी' ठरेल यात शंका नाही. म्हणून संत बसवेश्वर ते संत गाडगेबाबा यांच्या अंधश्रध्दा विरोधी विचारातुन 'नवसमाज' निर्माण करण्याच्या दृष्टीने सदर विषयाकडे साक्षेपी दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**


१. बसवेश्वर-आंबेडकर : एक तूलनात्मक अभ्यास-गोंडा जावरे

२. महाराष्ट्रीय संत मंडळीचे ऐतिहासिक कार्य-सुठणकर बा.रं.

३. भक्तमाला-नाभाजी

४. दिव्यामृतधारा-आर्वीकर बाबा महाराज

५. धर्माचे तत्वज्ञान-जोशी ज.वा.

६. विज्ञान आणि चमत्कार-गळतबे अद्वयानंद


♦♦♦